# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक १८/०६/२०१६

## सायं ४.३० वा.

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. १६/०३/२०१६ ची तहकुब सभा दि २९/०३/२०१६, मा. सर्वसाधारण सभा दि. १६/०४/२०१६, तसेच मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. २५/४/२०१६ रोजीचे इतिवृत्ते कायम करणे.</td><td>ठराव :- मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. १६/०३/२०१६ ची तहकुब सभा दि २९/०३/२०१६, मा. सर्वसाधारण सभा दि. १६/०४/२०१६, तसेच मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. २५/४/२०१६ रोजीचे इतिवृत्ते सर्वानुमते कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>१६/४/२०१६</td><td>मा. श्री. किरण भोईर</td><td>नगररचना विरूध्द किती जनहित याचिका प्रलंबित व पुर्ण आहेत. तसेच अनधिकृत बांधकामांबाबत अधिकाऱ्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांची (F.I.R.) माहिती व त्याच्या प्रती</td><td>१) मा. उपायुक्त - १, २ २) मा. उपसंचालक (नगररचना) ३) मा. सहा. आयुक्त A, B, C, D, E, F, G, H, I</td></tr>
<tr><td>२</td><td>१६/४/२०१६</td><td>मा. श्री. किरण भोईर</td><td>महापालिकेत मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याची नेमणुक झाली आहे काय? अग्निशमन विभागात एरीयल लेडल, हैड्रोलिक प्लॅटफॉर्म इ. अद्यावत उपकरणे आहेत काय? तसेच अद्यावत उपकरणे नसल्यास म्हाडा वसाहत बोळींज व खाजगी विकासकांना ७० मीटर उंच इमारत बांधण्याची परवानगी कोणत्या नियमानुसार दिली याची माहिती.</td><td>१) मा. उपायुक्त - २ २) मुख्य अग्निशमन अधिकारी ३) मा. उपसंचालक (नगररचना)</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>१ Pravin Prakash,(I.A.S.) Secretary & Mission Director (SBM) Government of</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | India Ministry of Urben Government<br><br>२ Pravin Prakash,(I.A.S.) Secretary & Mission Director (SBM) Government of India Ministry of Urben Government<br><br>३ महाराष्ट्र शासन, उपसचिव, नगरविकास विभाग, नवि-२०, मंत्रालय, मुंबई-३२ (शासन परिपत्रक) |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती गीता रमेश गोहिल, सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती गीता गोहिल यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती गीता गोहिल यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक ०७/०५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती गिता गोहिल यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री. राजाराम तुकाराम पवार, सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्री. राजाराम पवार यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री. राजाराम पवार यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक २५/०५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री. राजाराम पवार यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ६ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी अग्निशमन केंद्र अधिकारी, उपअग्निशमन केंद्र अधिकारी, अग्निशमन विमोचक व चालक यंत्रचालक ही पदे सरळ सेवेने भरणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** शासनाच्या सल्ल्यानुसार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी राज्य अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालयाकडून त्यांचे दि. ०२/०९/२०१५ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या प्रारुप सेवा प्रवेश नियमामध्ये उप-अग्निशमन केंद्र अधिकारी पदासाठी ४०, चालक यंत्र चालक पदासाठी ३० वर्ष व अग्निशामक विमोचक पदासाठी २५ वर्ष वयोमर्यादा विहित केली आहे. सदर पत्रात या सेवा प्रवेश नियमात शासनाची मान्यता मिळवून पदभरती करावी असे नमूद केले आहे.<br>अग्निशमन दलासाठी तरुण व सशक्त उमेदवार शारिरीक पात्रता पूर्ण करणारे कर्मचारी आवश्यक आहे. महानगरपालिका सेवेसंबंधी शासनाचे आरक्षण, वर्तणूक व शिस्त अपिल बाबतचे नियम जसेच्या तसे लागू करते. त्यामुळे आता शासनाच्या सामान्य |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक - एस.आर.व्ही २०१५/प्रक्र.४०४/कार्या १२, दि. २५ एप्रिल २०१६ नुसार शासन सेवा प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी सध्या कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे आहे त्यामध्ये ५ वर्षांनी वाढ करुन त्याची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे केली आहे. सदर शासन निर्णय आणि अग्निशमन सल्लागार यांच्या सल्यानुसार सेवाप्रवेश नियमास शासन मान्यता मिळवावयाची आहे, हे लक्षात घेऊन सुधारीत कमाल वयोमर्यादा महानगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यास सर्वानूमते मान्यता देत आहे तसेच शासनाकडे पाठविलेल्या सेवा प्रवेश नियमास मान्यता देतांना सुधारित वयोमर्यादा विचारात घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५७ (३) अन्वये मान्यता द्यावी, असा प्रस्ताव पाठविण्यास देखील सर्वानुमते मान्यता द्यावी.<br>महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास कंत्राटामार्फत अग्निशमन सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी शासनाचे आरक्षण धोरण इत्यादींची पूर्तता करणारे आहेत, त्यांना कर्नाटक राज्य विरुध्द उमादेवी (केस नं Appeal Civil) ३५९५-३६१२ of १९९९) प्रकरणी मा. सर्वोच्य न्यायालयाच्या खंडपिठाने दि. १० एप्रिल २००६ च्या निर्णयातील परिच्छेद ४६ अन्वये मंजुर पदावर सेवा भरती करतांना कमाल वयोमर्यादा शिथिल करुन तसेच त्यांनी केलेल्या सेवेस (प्राधान्य) वेटेज द्यावे असे निर्देश दिले आहेत. तसेच दि. १०/०४/२००६ च्या निर्णयातील परिच्छेद क्रं-४४ नुसार मंजूर पदे असतांना आणि ज्यांनी त्या संबंधित पदासाठी विहित केलेली पात्रता धारण करणाऱ्या आणि १० वर्षापेक्षा अधिक काळ (मा. न्यायालयाचे अथवा मा. लवादाचे निर्णयानुसार मिळालेला कालावधी वगळून) अनियमित नियूक्ती आहे, अशा कर्मचाऱ्यांची सेवा एकवेळची कार्यवाही म्हणून नियमित करावी, अशी तरतूद केली आहे, ती विचारात घेता,<br>१) या निकषांची (प्रवर्ग निहाय, आरक्षण, शैक्षणिक व शारीरिक पात्रता) करणाऱ्या व शासनाने दिनांक ०९/०९/२०१४ च्या शासन निर्णयांन्वये अग्निशमन विभागासाठी पदे मंजूर केली आहे त्या तारखेस म्हणजेच दिनांक ०९/०९/२०१४ रोजी सलग १० वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा वय क्षमापीत करुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे एकवेळची कार्यवाही (One Time Measure) नियमित करावी.<br>२) ज्या कर्मचाऱ्यांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक विमोचकाचे प्रशिक्षण पूर्ण केले नाही, त्या मागासवर्गिय व अमागासवर्गीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे आणि एका तुकडीत किती कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देता येईल, यासंबंधी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राशी सल्ला - मसलत करुन अशा प्रकारचे प्रशिक्षण द्यावे. जे कर्मचारी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणार नाही, त्यांना सेवा मुक्त केले जाईल असे त्यांच्या सेवा समावेशनाच्या आदेशात स्पष्टपणे नमूद करावे.<br>शासनाने दिनांक ०९ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयांन्वये अग्निशमन विभागासाठी २२६ पदे मंजूर करतांना व आकृतीबंध मंजूर करतांना आस्थापना खर्च विहित मर्यादेत असल्यास हि पदे विहित मार्गाने भरता येतील, असे नमुद केले आहे. महानगरपालिकेचा सन |

| | | |
|---|---|---|
| | | २०१५-१६ करीता आस्थापना खर्च २१.७५% आहे, हे लक्षात घेता पद भरती प्रक्रीया करावी तसेच या पात्र कर्मचाऱ्यांचेच आरक्षण निहाय समावेशन झाल्यानंतर उर्वरित पदांचा आढावा घेवून नव्याने जाहिरात द्यावी व त्यावेळी दिनांक ०५/०४/२०१६ च्या जाहिरातीस अनुलक्षण अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांचा विचार करावा.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ७ | शहर स्तरावर शहर उपजिविका केंद्र (CLC) स्थापन करणेबाबत. | **ठरावाचा निर्णय :-** वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत शहरी उपजिविका केंद्र स्थापन करणेकामी शासनाकडून रु.१०,००,०००/- (अक्षरी दहा लक्ष रु. मात्र) निधी प्राप्त होणार असून सदर खर्च बांधकाम वगळून फर्निचर, टेबल, संगणक, खुर्च्या व व्यवस्थापन देखभालीचा खर्च इत्यादीवर करण्यात येणार आहे व इतर त्या अनुषंगिक होणारा जास्तीचा खर्च महानगरपालिकेच्या फंडातून करण्याकामी आजची मा.महासभा प्रशासकीय व वित्तिय मान्यता एकमताने प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - लॉरेल डायस सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ८ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रात वसई पाचुबंदर येथे डिस्पेंसरी बांधणे. | **ठराव / निर्णय :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रू. १,१८,५२,५४८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ९ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दिमधील नागरी भागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १७६ व १७७ नुसार मल-जलाची विल्हेवाट लावणेकामी मलप्रक्रिया केंद्रासाठी मंजुर विकास आराखड्यामध्ये विविध ठिकाणी ६ -STP Zone तयार करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये काही आरक्षणाचे जागेमध्ये बदल करणे | **ठराव व निर्णय:-** वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वसई-विरार उपप्रदेशाचे मंजूर विकास आराखडयामध्ये नविन आरक्षणे प्रस्तावित करणेसाठी खाली नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे.<br>i. **STP Zone-४-गास-** आरक्षण क्र. ४०२ बाबतचा EP-१०१ शासनाकडून मंजूर झालेला असल्याने सदर ठिकाणचे STP चे आरक्षण क्र.४०२ रद्द झालेले आहे. त्याठिकाणी तातडीने STP ची कामे हाती घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नालासोपारा पश्चिम भागामध्ये STP बांधणेसाठी मौजे-गास, स.नं-४११A/१ पैकी, ४११-B पैकी, ४१०-A/१, A/१ पैकी जागेवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) अन्वये नविन आरक्षण प्रस्तावित करणेत येत आहे. (नकाशा क्र. VVCMC/MOD No.१/२०१६-१७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे) परंतु याकामी CRZ जागेमध्ये विकासकामे करण्यापूर्वी CZMA कडुन परवानगी घेणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तसेच काही नविन आरक्षण प्रस्तावित करणे व प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत. | ii. **STP-Zone-५-माणिकपूर-** गांव मौजे-माणिकपूर येथील स.नं.१४८ व स.नं.१४९ हया जागेवर STP साठी मंजूर विकास आराखडया मध्ये आरक्षण क्र.५८० दर्शविण्यात आलेले आहे. सदर जागा केंद्र सरकारच्या नमक विभागाची (Salt pan) आहे. सदर आरक्षणाचे जागेमधिल काही भागात तिवरांची झाडे (Mangroves) आहेत. तसेच सदर भागात तातडीने STP चे कामे हाती घेणे आवश्यक असल्यामुळे आरक्षणाची जागा मौजे-माणिकपूर, स.नं.१४९ हि.नं-पैकी मध्ये फेरबदल करुन (स्थलांतर करुन) यापूर्वीचे विकास आराखडयामध्ये नमुद आरक्षण क्र.५८० रद्द करुन फेरबदल केलेल्या नविन आरक्षणास आरक्षण क्र.५८० असे संबोधण्यांत येत आहे. या करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) नुसार विकास आराखडयात फेरफार करणेची कार्यवाही करुन प्रस्तावीत करणेंत येत आहे. (नकाशा क्र. VVCMC/MOD No.२/२०१६-१७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे) परंतु याकामी CRZ जागेमध्ये विकासकामे करण्यापूर्वी CZMA कडुन परवानगी घेणे आवश्यक आहे.<br><br>iii. **STP- Zone-६ उमेळे -** गांव मौजे-उमेळे येथील स.नं.९९ पैकी व स.नं.१२३ हया जागेवर मंजूर विकास आराखडयामध्ये STP साठी आरक्षण क्र.७३३ दर्शविण्यात आलेले आहे. सदर जागेपैकी काही जागा केंद्रशासनाचे सॉल्ट विभाग व काही जागा राज्य शासनाचे सॉल्ट विभागाची आहे. सदर जागेवर मिठाचे उत्पादन होत असल्यामुळे व काही जागेवर Mangroves असल्याने STP च्या आरक्षणासाठी पर्यायी जागा उपलब्ध होणे गरजेचे आहे. याकरिता मौजे-उमेळे येथील स.नं.९९ पैकी व स.नं.१२४ मध्ये व यापूर्वीचे विकास आराखडयामध्ये नमुद आरक्षण क्र.७३३ रद्द करुन या Shift/बदल केलेले नवीन आरक्षणास आरक्षण क्र.७३३ असे संबोधण्यांत येत आहे. याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) नुसार विकास आराखडयात फेरफार करणेची कार्यवाही करुन प्रस्तावित करणेंत येत आहे. (नकाशा क्र. VVCMC/MOD No.३/२०१६-१७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे) परंतु याकामी CRZ जागेमध्ये विकासकामे करण्यापूर्वी CZMA कडुन परवानगी घेणे आवश्यक आहे.<br><br>iv. **STP-Zone-७-मालोंडे-** गांव मौजे-मालोंडे येथील स.नं.६९ क्षेत्र १२३३५ चौ.मी. मध्ये आरक्षण क्र.६८४ ही जागा STP साठी आरक्षित दर्शविण्यांत आलेली आहे. सदर जागा ही CRZ ने बाधीत आहे. सदर जागा महानगरपालिकेचे ताब्यात आहे मात्र सदर आरक्षणाचे जागेमध्ये मोठया प्रमाणात मॅनग्रोवज असल्यामुळे व तातडीने STP ची कामे हाती घेणे आवश्यक असल्यामुळे मंजूर विकास आराखडयात नवीन आरक्षण प्रस्तावित करावे लागणार आहे.<br>मौजे-मालोंडे, स.नं-६९ व स.नं-१०५ मध्ये व त्यास आरक्षण क्र.६८४ दर्शवून व मंजूर विकास आराखडया मधिल यापूर्वीचे आरक्षण ६८४ रद्द करणे याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) नुसार विकास आराखडयात फेरफार करणेची कार्यवाही करुन नविन आरक्षण प्रस्तावित करण्यांत येत आहे. (नकाशा क्र. VVCMC/MOD No.४/२०१६-१७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे) परंतु याकामी CRZ जागेमध्ये विकासकामे करण्यापूर्वी CZMA कडुन परवानगी घेणे आवश्यक आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरिवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |

| | | |
|---|---|---|
| १० | मा. आमदार श्री. क्षितीज ठाकूर ह्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम (सन २०१५-१६) अंतर्गत कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर कामांना तसेच आमदारांच्या मंजुर अनुदाना व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाच्या ई- निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक - नरेंद्र पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ११ | मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर ह्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम (सन २०१५-१६) अंतर्गत कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर कामांना तसेच आमदारांच्या मंजुर अनुदाना व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाच्या ई- निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक - कांता पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १२ | संजय चंद्रकांत परब, लिपिक यांचे विभागीय चौकशीच्या अहवालावर निर्णय घेणे. | **ठराव / निर्णय :-** श्री. संजय चंद्रकांत परब, लिपीक यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमान्वये केलेल्या विभागीय चौकशीत त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले नाहीत. तसेच हस्ताक्षर तज्ञांच्या हस्ताक्षर तपासणीत दाखल्यावरील हस्ताक्षर श्री. संजय परब यांचेच असल्याचे सिध्द झालेले नाही. यास्तव श्री. संजय चंद्रकांत परब, लिपीक यांना त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपांतुन दोषमुक्त करण्याचा निर्णय ही महासभा घेत आहे.प्रशासनाने त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.<br>अनुमोदक - भरत मकवाना सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १३ | वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मयत सफाई कामागारांच्या वारसास वारसा हक्क पद्धतीने महानगरपालिका सेवेत सामावुन घेणेबाबत. | **<u>ठराव / निर्णय</u> :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने कै. जयवंत सुकऱ्या पेडवी यांच्या वारस पत्नी श्रीमती दिपा जयवंत पेडवी यांना महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - लॉरेल डायस सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १४ | वसई-विरार शहर महानगरपालिका भुयारी गटार योजनेंतर्गत (STP-२) मुख्य मलनिस्सारण वाहिनीला इमारतीच्या सेप्टीक टॅंकशी जोडणी करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत (STP-२) मुख्य मलनि:स्सारण वाहिनीला इमारतीच्या सेप्टीक टॅंकशी जोडणी करणेकामी रु. ४५,८०,०२,२८७/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय मंजुरी देत आहे व सदर कामाच्या निविदा मागवून ह्या कामासाठी नोंदणीकृत ठेकेदारांचे पॅनेल नियुक्त करणेत यावे, असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १५ | नियुक्तीच्यावेळी अधिक असलेले वय क्षमापनाबाबत. | **<u>ठराव/निर्णय</u> :-** प्रशासनाच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यांत आला. उपरोक्त आठ कर्मचाऱ्यांपैकी श्री. अनंत सोंडकर, सफाई कामगार हे दि. ३१ ०८/२०१५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. श्रीमती वासंती कामतेकर, सफाई कामगार या दि. २७/७/२०१३ रोजी मयत झाल्या आहेत. उर्वरित सहा कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी लवकरच नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. या सर्वांचे नियुक्तीवेळेचे वय विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त असल्याने त्यांना देय |

| | | |
|---|---|---|
| | | सेवानिवृत्तीवेतन व इतर अनुषंगिक लाभ मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांची सेवा ईमानेईतबारे केली असून, त्यांचेविरुध्द कोणतीही प्रशासकीय शिस्तभंगविषयक कारवाई सुरु वा प्रलंबित नाही. तरी शासनाकडून एक विशेष बाब म्हणून या आठही कर्मचाऱ्यांची वयाची अट शिथिल करुन घ्यावी व त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे देय लाभ त्वरीत अदा करावेत, असा निर्णय ही महासभा घेत आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I कार्यक्षेत्रामध्ये पाईप गटाराचे बांधकाम करणेकामी R.C.C. विविध व्यासाचे पाईप पुरवठा करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देऊन ई-निविदा मागविणेकामी मान्यता देणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सन २०१६-१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शह महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I कार्यक्षेत्रामध्ये पाईप गटाराचे बांधकाम करणेकामी RCC विविध व्यासाचे पाईप पुरवठा करणे कामी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे. सदर कामासाठी ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे ३ वर्षासाठी बी - २ निविदा दर मागविण्यात यावेत, असे ही सभा ठरविते आहे. |

| अ.क्र. | प्रस्तावाच्या बाजूने असलेल्या सदस्यांची नावे | | अ.क्र. | प्रस्तावाच्या बाजूने असलेल्या सदस्यांची नावे |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | | १ | ३ |
| १ | प्रविणा हितेंद्र ठाकूर, महापौर | | ५० | निलिमा आनंद कांबळे |
| २ | उमेश नाईक, उप महापौर | | ५१ | शबनम आरीफ शेख |
| ३ | गोवारी दिलीप यशवंत | | ५२ | अतुल रमेश साळुंखे |
| ४ | पाटील यज्ञेश्वर अनंत | | ५३ | सुषमा उमेश दिवेकर |
| ५ | कांता अनंत पाटील | | ५४ | शोभा नितीन मोरे |
| ६ | किणी जयश्री जयवंत | | ५५ | पुष्पा विजय घोलप |
| ७ | पाटील विनय दिवाकर | | ५६ | जया शाम पेंढारी |
| ८ | पांडुरंग मोरोपंत इंगळे | | ५८ | दुबे सरीता प्रमोद |
| ९ | जिनत अक्रम शेख | | ५९ | कल्पना रोहीदास म्हात्रे |
| १० | नरेंद्र वसंत पाटील | | ६० | पुष्पा अल्पेश रुपानी |
| ११ | संजय दिगंबर पिंगुळकर | | ६१ | चंद्रकांत सिताराम जाधव |
| १२ | ममता दुर्गेश सुमन | | ६२ | दिक्षा दिपेश घरत |
| १३ | वासंती हरिश्चंद्र पाटील | | ६३ | प्रफुल गोविंद पाटील |
| १४ | सुरेखा विवेक कुरकुरे | | ६४ | धुमाळ देवयानी किशोर |
| १५ | सुषमा संजय लोपिस | | ६५ | आचोळकर सुनिल मोरेश्वर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १६ | रिटा कनुभाई सरवैया | | ६६ | उषा शशिकांत ठाकूर | |
| | | | १७ | भारती प्रदीप देशमुख | | ६७ | रेश्मा रमेश जाधव | |
| | | | १८ | प्रज्ञा विनेश देसाई | | ६८ | भुपेंद्र आत्माराम पाटील | |
| | | | १९ | सुदेश प्रभाकर चौधरी | | ६९ | रुपेश सुदाम जाधव | |
| | | | २० | प्रतिभा किशोर पाटील | | ७० | भावना सुनिल शेवाळे | |
| | | | २१ | प्रतिमा सचिन पाटील | | ७१ | चंद्रकांत यशवंत गोरिवले | |
| | | | २२ | पुतुल रविंद्र झा | | ७२ | वैभव सुदाम पाटील | |
| | | | २३ | मिनल रमाकांत पाटील | | ७३ | समीर जीकर डबरे | |
| | | | २४ | चिरायू प्रणव चौधरी | | ७४ | वृन्देश रघुनाथ पाटील (उमा पाटील) | |
| | | | २५ | संगीता किशोर भेरे | | ७५ | निलीमा नरेश गायकवाड | |
| | | | २६ | हेमांगी विनोद पाटील | | ७६ | भोईर विजया अजित | |
| | | | २७ | हार्दीक रविंद्र राऊत | | ७७ | शकुंतला नागेश शेळके | |
| | | | २८ | प्रशांत दत्तात्रय राऊत | | ७८ | आशा बाळकृष्ण धुलसाडा | |
| | | | २९ | सखाराम शंकर महाडीक | | ७९ | चोरघे पंकज नारायण | |
| | | | ३० | ज्योती राजेश राऊत | | ८० | फ्रान्सिस डॉमनिक डिसोजा | |
| | | | ३१ | रंजना लाडक्या थालेकर | | ८१ | मानकर कल्पेश नारायण | |
| | | | ३२ | अजित यशवंत नाईक | | ८२ | पाटील संदीप कृष्णा | |
| | | | ३३ | रजनी शशिकांत  पाटील | | ८३ | राऊत नितीन दिनानाथ | |
| | | | ३४ | किशोर नाना पाटील | | ८४ | जाधव पुष्पा संदेश | |
| | | | ३५ | छाया धर्मदत्त पाटील | | ८५ | पापडे अमिता सुनिल | |
| | | | ३६ | देसाई सचिन संभाजी | | ८६ | घरत सचिन हरेश्वर | |
| | | | ३७ | अब्दुल हक सुलेमान पटेल | | ८७ | भोईर कन्हैया (बेटा) मनोहर | |
| | | | ३८ | पंकज पद्माकर पाटील | | ८८ | वर्तक मनिष आत्माराम | |
| | | | ३९ | अंजली रामचंद्र पाटील | | ८९ | धोंडेकर ज्योती मच्छिंद्र | |
| | | | ४० | मिलींद जगन्नाथ घरत | | ९० | ॲड. प्राची लेरॉय कोलासो | |
| | | | ४१ | अनिता भागवत यादव | | ९१ | पीरखान उजमा दिलदार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२ | किसन माया बांडागळे | | ९२ | प्रविण चिन्नया शेट्टी |
| ४३ | सलीमुन्नीसा अ. समानी | | ९३ | डायस लॉरेल डायगो |
| ४४ | रुपाली सुनिल पाटील | | ९४ | पाटील विद्या चेतन |
| ४५ | निलेश दामोदर देशमुख | | ९५ | शेख अफीफ जमिल |
| ४६ | अरुण हरिश्चंद्र जाधव | | ९६ | गमज्या अलका सतीश |
| ४७ | किशोर गजानन पाटील | | ९७ | रमेश जयराम घोरकना |
| ४८ | भरत प्रभुदास मकवाना | | | |
| ४९ | शुभांगी राजेश गायकवाड | | | |

| अ.क्र. | प्रस्तावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | २ |
| १ | बांदेकर स्वप्नील अविनाश |
| २ | धनंजय विठ्ठल गावडे |
| ३ | शिल्पा सरोजकुमार सिंग |
| ४ | म्हात्रे प्रिती दिनेश |
| ५ | किरण उदय चेंदवणकर |

**प्रस्तावाच्या विरोधात :- ०५**

**प्रस्तावाच्या बाजुने :- ९७**

अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)

ठराव सर्वांनुमते मंजुर

| | | |
|---|---|---|
| १७ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेच्या मालकीची वाहने दुरुस्ती करण्यांस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | <u>ठराव / निर्णय</u> :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता सन २०१६-२०१७ ह्या वित्तीय वर्षाकरिता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाकडील व सर्व प्रभाग समिती कार्यालयाकडील विविध प्रकारची वाहने दुरुस्त करण्यासाठी दर मंजुरी करिता वार्षिक निविदा मागविण्यासाठी हि सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे. अनुमोदक - कन्हैया भोईर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १८ | दलित वस्ती सुधारणा योजना सन २०१४-१५ या वर्षात कामांना प्रशासकीय मान्यता | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर योजने अंतर्गत वरीलप्रमाणे कामांना प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत असून मंजुर अनुदाना व्यतिरीक्त होणारा खर्च महानगरपालिका फंडातुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे |

<table>
<tr><td></td><td>मिळणेबाबत.</td><td>निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - रुपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>१९</td><td>४९ शेतकरी यांचे मागणी आवेदन पत्रानुसार यादी अंतिम करून लाभ उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत.</td><td><u>ठराव/निर्णय</u> :- उपरोक्त प्रस्तावावर सभेत साधकबाधक चर्चा करणेत आली. चर्चेनुसार सिंचन विहीरीसाठी व इतर साहित्यासाठी मागणी केलेल्या ४९ अर्जांची निकषानुसार पात्रता ठरवून लाभ देणेत यावा, त्याचप्रमाणे याबाबत येणाऱ्या मागणी अर्जांचाही विचार अशाचप्रकारे करुन त्यांनाही लाभ देणेत यावा. मागणी करणेत आलेले साहित्य उ.दा. फवारणी पंप, जंतुनाशके, बियाणे व खत यांचा पुरवठा आदेश तत्कालीन ठेकेदार मे. डहाणू ॲग्रो ट्रेडींग कॉर्पोरेशन या मंजूर ठेकेदाराकडून साहित्य खरेदी करुन लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देणेस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - कन्हैया भोईर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२०</td><td>फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) अवनत वनक्षेत्रावर वनीकरण करणेबाबत वसई-विरार शहर महानगरपालिका यांचा २०१६ चे पावसाळ्यात वनीकरण करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.</td><td>ठराव/निर्णय :- उपरोक्त प्रस्तावावर साधक बाधक चर्चा करणेत आली. सदर चर्चेनुसार सदर प्रस्तावास बहुमताने प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेत येत आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२१</td><td>मौजे दिवाणमान १७६, १७७ मधील दफनभुमीसाठी आरक्षित जमिन सर्व धर्मियांसाठी विभागून देणेबाबत.</td><td><u>प्रस्तावाचा निर्णय :-</u> वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील आरक्षण क्र. ५९४ मौजे दिवानमान स.नं १७६.१७७ मधील दफनभूमी साठी आरक्षित जमीन सर्व धर्मियांच्या समाजाच्या प्रमुखांनी त्यांच्या समाजाच्या गरजेप्रमाणे जागेचे क्षेत्र दफनभूमीच्या वापरासाठी विभागून दिलेले आहे. त्यानुसार सदर जागा सर्व धर्मियांच्या वापरासाठी पुढीलप्रमाणे विभागून वापर करणेस ही सभा मान्यता देत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>धर्मीयांचे वर्गीकरण</th><th>क्षेत्र</th></tr>
<tr><td>१</td><td>सुन्नी मुस्लिम</td><td>८५४३ चौ. मी.</td></tr>
<tr><td>२</td><td>दाऊदी बोहरा मुस्लिम</td><td>३०६५ चौ. मी.</td></tr>
<tr><td>३</td><td>सैय्यद शिय्या मुस्लिम</td><td>३०६५ चौ. मी.</td></tr>
<tr><td>४</td><td>खोजा शिय्या मुस्लिम</td><td>३०६५ चौ. मी.</td></tr>
<tr><td>५</td><td>ख्रिश्चन</td><td>४५६५ चौ. मी.</td></tr>
<tr><td>६</td><td>हिंदु</td><td>९६५ चौ. मी.</td></tr>
<tr><td>७</td><td>बेवारस</td><td>४०० चौ. मी.</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ८ \| अंतर्गत रस्त्यासाठी \| १२३२ चौ. मी.<br>मा. जिल्हाधिकारी यांच्या कडील आदेशानूसार सदर जागेची मालकी ही वसई विरार शहर महानगरपालिकेची राहील व सदर जागेचा देखभाल दुरूस्ती, संपूर्ण जागेचे नियंत्रण वसई विरार शहर महानगरपालिकेचे राहील.<br>ठराव सर्वानूमते मंजूर<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २२ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने/बगिचे देखभालीसाठी नोंदणीकृत महिला बचत गट व नोंदणीकृत संस्थेस देणेबाबत महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीस प्राधिकृत करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत. | <u>**ठराव/निर्णय :-**</u> उपरोक्त प्रस्तावावर सभेत सर्वगुणात्मक चर्चा करणेत आली. चर्चेनुसार वसई विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील १३८ उद्याने / बगीचे देखभाल व राखण यासाठी महिला सक्षमीकरणांतर्गत उद्यानांची देखभाल व राखण यासाठी महानगरपालिका हद्दीतीलच विहीत मुदतीत आलेले महिला बचत गट यांचे अर्जांवर महिला बालकल्याण सभापती यांनी उद्यानांचे प्रतवारीप्रमाणे तसेच महिला बचत गटांची क्षमता / कुवत तपासून तसेच त्यांचा पूर्वानुभव गृहित धरुन उद्याने नोंदणीकृत महिला बचत गटांना देखभाल व राखण करणे याकरिता वाटप करणेबाबत (जवळपास असणारी उद्याने, अनुभव, बाजारपेठेतला सहभाग) इ. बाबी विचारात घेऊन शिफारस केलेली आहे यावर विचारविनिमय करुन त्यापैकी ज्या महिला बचत गटांची महिला बालकल्याण विभागाकडे नोंदणी केलेली असेल अशाच नोंदणीकृत बचत गटांची एकत्रितपणे सभा घेऊन सभेतील चर्चेनुसार महिला बचत गट यांची उद्यानांची देखभाल व राखण याप्रती असणारी इच्छाशक्ती व त्यांची आर्थिक कुवत बघून त्यांच्या जवळपास असणाऱ्या उद्यानांनुसार उद्यानांचे महिला बचत गट यांना वाटप उद्यान विभाग व महिला बालकल्याण विभागामार्फत संयुक्तपणे प्रायोगिक तत्वावर सुरुवातीच्या सहा महिनेकरिता करणेत यावे, त्याचप्रमाणे महिला बचत गट यांना महानगरपालिकेने उद्यानांमधे उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर स्वखर्चाने स्टॉल उभारणेसाठी अनुमती देणेत यावी. तसेच उद्यानांचे महिला बचत गट यांना वाटप झ ााल्यानंतर सुरुवातीला त्यांना प्रायोगिक तत्वावर सहा महिनेकरिता अनुदान देऊन त्यानंतर त्यांनी सहा महिन्यांत केलेल्या कामातील कुशलता, कार्यक्षमता, सुशोभिकरण इ. बाबींचे निरीक्षण करुन निरीक्षण अहवाल सादर केल्यानंतरच त्यांना पुढील एक वर्षाकरिता देखभाल व राखण याकरिता मुदतवाढ मा. आयुक्त यांचे निर्देशानुसार देणेत येईल, या अटीशर्तीवर नोंदणीकृत महिला बचत गट यांना प्रायोगिक तत्वावर सुरुवातीच्या सहा महिनेपर्यंत वाटप करणेस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणी आढावा. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावीत उपाययोजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - पांडुरंग इंगळे सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |